ISSN:0971-2143
Vol-31-Issue-09-April-2020

# पर्यटनाचे उपेक्षित वैभव – अहमदनगर शहरातील वास्तू

**डॉ. अर्चना टाक**
इतिहास विभागप्रमुख,
राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर.
dept.of.history.rsml@gmail.com

**गोषवारा :**

शैक्षणिक अभ्यास सहली विद्यार्थ्यांच्या जीवनामध्ये महत्त्वाची भूमिका बजावतात. चार भिंतींच्या आतील औपचारिक शिक्षणाच्या बाहेर जाऊन निसर्गाच्या शाळेत विद्यार्थी हा अनुभवावर शिकत असतो. अशा अभ्यास सहलींतून विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडते. अभ्यास सहलींच्या माध्यमातून विद्यार्थी आनंदाने शिक्षण घेत असतात. ते प्रत्येक गोष्ट मनापासून शिकत असतात. एखादी गोष्ट दुस-याने सांगण्यापेक्षा स्वत: पाहिल्यावर ती लवकर समजते. नवनवीन ठिकाणांना भेटी दिल्यामुळे विद्यार्थ्यांना त्या ठिकाणांबद्दल, तेथील परिसर, त्या ठिकाणांचा इतिहास समजण्यास मदत होते. म्हणूनच त्यांच्या ज्ञानात भर पडावी याकरिता शैक्षणिक अभ्यास सहलींचे आयोजन बहुतेक शिक्षणसंस्थांमध्ये केले जाते. मी देखील माझ्या विभागातील विद्यार्थ्यांना घेऊन शैक्षणिक अभ्यास सहलींचे आयोजन दरवर्षी प्रत्येक सत्रात करते. जाणीवपूर्वक ऐतिहासिक पर्यटनस्थळांना आम्ही भेटी देतो. मागील शैक्षाणिक वर्षी आम्ही अहमदनगर येथे शैक्षणिक अभ्यास सहलीचे आयोजन केले होते. महाविद्यालयातून सहल निघण्यापूर्वी विद्यार्थ्यांचे पालक त्यांना सोडण्याकरिता आले होते. माझ्या एका विद्यार्थीनीचे वडिल लातूर शहरातील एका वरिष्ठ महाविद्यालयात प्राध्यापक आहेत. त्यांनी मला प्रश्न केला, 'मॅडम, अहमदनगरला बघण्यासारखे काय आहे?' मी त्यांना थोडक्यात माहिति सांगितली. व याहून खूप जास्त व छान माहिती

Copyright © 2020Authors

ISSN:0971-2143
Vol-31-Issue-09-April-2020

सहलीवरुन परतल्यानंतर तुमची कन्या तुम्हाला सांगेल, असे मी त्यांना सांगितले. हा प्रसंग इथे नमूद करण्याचे कारण हे आहे की, 'अहमदनगरला बघण्यासारखे काय आहे?' हा प्रश्न बहुतेकांच्या मनात निर्माण होत असल्याने माझ्या आतापर्यंतच्या निरिक्षणातून मला दिसून आले आहे. याचे कारण काय असावे? यावर मी विचार केला. माझ्या अभ्यासातून, विचारमंथनातून मला याचे कारण सापडले. तेच मी या लेखाच्या रुपात अहमदनगर शहरातील निजामशाहीकालीन वास्तूंच्या संदर्भाने मांडत आहे.

लेख :

**निजामपूर्वकालीन अहमदनगर :**

अहमदनगर जिल्हा हा क्षेत्रफळाच्या दृष्टीने महाराष्ट्रातील सर्वांत मोठा जिल्हा आहे. या जिल्ह्याला प्राचीन काळापासूनचा इतिहास लाभला आहे. प्राचीन काळात विंध्य पर्वत व नर्मदा नदी यांचे दक्षिणेस असलेल्या या प्रांतास दक्षिणापथ असे संबोधित. ख्रिस्तपूर्व चौथ्या शतकात कात्यायान व महिष्मती यांनी दक्षिणेकडील काही शहरांचा उल्लेख केला आहे. त्यावरुन याभागात त्याकाळात वस्ती होती हे समजते. इ.स. १५० मध्ये अहमदनगर शहराच्या पूर्वेस वसलेल्या गोदातीरावरील प्राचीन शहर प्रतिष्ठाण अगर पैठण या सातवाहनांच्या राजधानीचा उल्लेख प्राचीन इजिप्सीअन प्रवासी टॉलमी यांनी केलेला आहे. तद्नंतर इ.स.२४७ मध्ये पेरिप्लस या ग्रीक ग्रंथातही पैठणचा उल्लेख सापडतो. त्यावरुन पैठणच्या सातवाहनांची सत्ता या प्रांतावर होती हे निश्चित होते. तद्वतच नगरचे पश्चिमेस वसलेले "जुने नगर" ऊर्फ "जुन्नर" या नगराचाही उल्लेख सापडतो. सांप्रतचे नगर शहराचे भिंगार हेहि तसेच फार प्राचीन ग्राम आहे.(१)

इस्लामी आक्रमणापूर्वीपर्यंत अहमदनगरच्या परिसरावर पुढील राजवंशांनी राज्य केले.

इ.स.पू.९० ते इ.स.३०० या काळात पैठणच्या सातवाहनांनी (आंध्रभृत्य) या प्रदेशावर राज्य केले होते. इ.स.५५० ते ६७० या काळात या प्रदेशावर बदामीच्या चालुक्यांनी अधिराज्य गाजविले होते. राष्ट्रकुटांनी इ.स. ६७० ते ९७३ या काळात या प्रदेशावर राज्य केले होते. नंतर पुन्हा इ.स.९७३ ते ११९० या काळात हा प्रदेश चालुक्यांच्या ताब्यात आला. इ.स.११९० ते १३१० या १२० वर्षांच्या कालावधीत देवगिरीचे यादव या प्रदेशावर राज्य करत होते.(२) यादवांच्या सत्तेच्या शेवटच्या काळात म्हणजे इ.स.१२९६ या वर्षी अल्लाउद्दीन खिल्जीच्या रुपाने दक्षिण भारतावर पहिले मुस्लिम आक्रमण झाले. यादवांनी अल्लाउद्दीन खिल्जीचे मांदलिकत्व स्विकारले. इथुन पुढे एकंदर चारवेळा अल्लाउद्दीन खिल्जीचा सेनापती मलिक काफूर



Copyright © 2020Authors

ISSN:0971-2143
Vol-31-Issue-09-April-2020

याने महाराष्ट्रावर मोठी आक्रमणे केली व इ.स.१३१८ च्या आक्रमणात देवगिरीच्या यादवांच्या सत्तेचा -हास होऊन या प्रांतावर इस्लामी राजवट सुरु झाली. इ.स. १३१८ ते १३३८ या काळात मुसलमानी सुभेदरांचा अंमल या प्रांतावर होता. इ.स. १३३८ मध्ये दिल्लीचा सुलतान महम्मद बिन तुघलक याने आपली राजधानी दिल्लीहून देवगिरी येथे आणली होती.(३)

**अहमदनगर शहरातील निजामकालीन वास्तू :**

**१] भुईकोट किल्ला :**

पंधराव्या शतकाच्या अखेरिस १४८६ मध्ये तत्कालिन बहामनी साम्राज्याचे पाच राज्यांमध्ये विभाजन झाले. त्यामधून फुटून निघालेल्या मलिक अहमद याने १४९० मध्ये सीना नदीकाठी भिंगार जवळ नवीन शहर वसविण्यास सुरुवात केली. त्याच्या नावावरुनच या शहराला अहमदनगर असे नाव पडले. १४९४ मध्ये शहराची रचना पूर्ण होऊन हे शहर निजामशाहीची राजधानी बनले. या शहराची तुलना त्याकाळी कैरो, बगदाद या समृद्ध शहरांशी केली जात असे. बहामनी साम्राज्याचा वजीर भली मोठी फौज घेऊन मलिक अहमदवर चालून आला असता मलिक अहमदने आपल्या छोट्याशा सैन्यानिशी गनिमी काव्याने लढून त्याचा पराभव केला. ज्या जागेवर त्याने हा विजय मिळविला ती जागा त्याला यशदायी वाटली. ही जागा त्याला यशदायी वाटण्यासंदर्भात एक आख्यायिकाही सांगितली जाते. ती अशी - मलिकने याच जागेत एक कुत्रा एका सशाला घाबरुन पळून जात आहे असे दृश्य पाहिले. म्हणून ही जागा त्याला खूप चांगली वाटली. या जागेवरच आपले निवासस्थान बांधण्याचा निर्णय त्याने घेतला. त्याने या ठिकाणी आपल्या निवासासाठी जी वास्तु बांधली ती म्हणजेच कोट बाग निजाम होय. हा किल्ला आज भुईकोट किल्ला या नावाने ओळखला जातो. मलिक अहमद, बु-हाण निजामशहा, हुसेन निजामशहा, चाँदबिबी यांच्या वैभवशाली राजवटी निजामशाहीत होऊन गेल्या. १६३६ मध्ये मोगलांनी अहमदनगर काबीज केले. १७५९ यावर्षी पेशव्यांनी अहमदनगरवर ताबा मिळविला.

१७९७ मध्ये पेशव्यांनी या किल्ल्याचा ताबा शिंदे यांच्याकडे दिला. शिंदेकडून १२ ऑगस्ट १८०३ रोजी ब्रिटिश सेनापती जनरल वेलस्लीने तो जिंकून घेतला. १९४२ च्या चलेजाव आंदोलनाच्या काळात पंडित जवाहरलाल नेहरु, सरदार वल्लभभाई पटेल, डॉ. पी.सी. घोष, अरुणा असफ अली, मौलाना आझाद, गोविंद पंत, पंडित हरेकृष्ण मेहताब, आचार्य जे.बी. कृपलानी, डॉ. पट्टाभिसीतारामय्या, शंकरराव देव, आचार्य नरेंद्र देव या राष्ट्रीय आंदोलनातील नेत्यांना या किल्ल्यात स्थानबद्ध करण्यात आले होते. **डीस्कव्हरी ऑफ इंडिया** हा जगप्रसिद्ध ग्रंथ


Copyright © 2020Authors

ISSN 0971-2143
Vol-31-Issue-09-April-2020

पंडित जवाहरलाल नेहरूंनी याच ठिकाणी लिहिला. या ग्रंथाची काही हस्तलिखित पानेही या ठिकाणी पाहण्यास मिळतात. याच किल्ल्यात कैदेत असताना डॉ.पी.सी. घोष यांनी **हिस्ट्री ऑफ एन्शट इंडियन सिव्हीलायझेशन** हा ग्रंथ लिहिला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी **थॉट्स ऑफ पाकिस्तान** आणि मौलाना आझाद यांनी **गुबार-ए-खातिर** हे ग्रंथ याचवेळी येथे लिहिलेले आहेत. १९४७ ला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर हा किल्ला स्वतंत्र भारत सरकारच्या सैन्यदलाच्या ताब्यात देण्यात आला आहे.

चलेजाव आंदोलनाच्या काळात या किल्ल्यात राष्ट्रीय आंदोलनातील नेत्यांनी वास्तव्य केलेल्या खोल्या, त्यांनी वापरलेले सामान, पलंग, खुर्च्या, टेबल, गादी, कपडे वाळत घालण्याचे स्टॅण्ड या साऱ्या गोष्टी येथे जतन करून ठेवलेल्या आहेत.

२] चाँदबिबीचा महाल :

चाँदबिबी ही अहमदनगरचा निजामशहा पहिला हुसेन याची कन्या व पुढे त्याचा वारसदार बनलेल्या बुऱ्हाण-उल-मुल्कची बहिण होती. तिला अरबी, फार्सी, मराठी, कन्नड, तुर्की या भाषांचे सखोल ज्ञान होते. ती विद्वान स्त्री होती. तिच्या बुद्धीमत्तेला सौंदर्याचीही जोड होती. तिला सतार वाजविण्याचा व फुलांची चित्रे काढण्याचा छंद होता. विजापूरचा सुलतान पहिला अली आदिलशहा याच्याशी तिचा विवाह झाला होता. १५८० मध्ये त्याच्या मृत्यूनंतर सत्तासंघर्षामुळे आदिलशाहीत अंदाधुंदी माजली. सुमारे दशकभर चाललेल्या उलथापालथी नंतर आदिलशाहीची घडी नीट बसवल्यावर विधवा चाँदबिबी अहमदनगरला आपल्या माहेरी आली. इथुन पुढे तिनेच निजामशाहीचे तख्त राज्यपालक राणीच्या नात्याने सांभाळले. नोव्हेंबर १५९५ मध्ये निजामशाही बुडविण्यासाठी बादशहा अकबराच्या सैन्याने अहमदनगरवर चाल केली. तेव्हा चाँदबिबीने निजामशाहीच्या सैन्याचे नेतृत्व करून मोगल सैन्यास अल्पकाळ रोखून धरले. कालांतराने जेव्हा मोगलांशी युद्धबंदीच्या तहाची बोलणी ती करू लागली, तेव्हा ती मोगलांना फितुर झाल्याच्या अफवा पसरु लागल्या. निजामशाही निजामशाही सैन्यातील असंतोषाने भडकलेल्या काही लोकांच्या जमावाने तिची हत्या केली. तिच्या मृत्यूनंतर थोड्याच महिन्यांनी मोगलांनी अहमदनगरचा पाडाव केला. असे सांगितले जाते की, अहमदनगर मधून दिल्ली पाहण्याची तिची इच्छा होती. म्हणूनच अहमदनगर शहरात तिने एक महाल बांधण्यास सुरुवात केली होती. परंतु या महालाचे तीनच मजले बांधून पूर्ण झाल्यानंतर तिची हत्या झाली. त्यामुळे पुढे हे बांधकाम बंद पडले. चाँदबिबीचा विश्वासू सेवक सलाबतजंग याची कबर येथे आहे.



Copyright © 2020Authors

ISSN:0971-2143
Vol-31-Issue-09-April-2020

पंडित जवाहरलाल नेहरुंनी याच ठिकाणी लिहिला. या ग्रंथाची काही हस्तलिखित पानेही या ठिकाणि पाहण्यास मिळतात. याच किल्ल्यात कैदेत असताना डॉ.पी.सी. घोष यांनी **हिस्ट्री ऑफ एन्शट इंडियन सिव्हीलायजेशन** हा ग्रंथ लिहिला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी **थॉट्स ऑफ पाकिस्तान** आणि मौलाना आझाद यांनी **गुबार-ए-खातिर** हे ग्रंथ याचवेळी येथे लिहिलेले आहेत. १९४७ ला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर हा किल्ला स्वतंत्र भारत सरकारच्या सैन्यदलाच्या ताब्यात देण्यात आला आहे.

चलेजाव आंदोलनाच्या काळात या किल्ल्यात राष्ट्रीय आंदोलनातील नेत्यांनी वास्तव्य केलेल्या खोल्या, त्यांनी वापरलेले सामान, पलंग, खुर्च्या, टेबल, गादी, कपडे वाळत घालण्याचे स्टॅण्ड या सा-या गोष्टी येथे जतन करुन ठेवलेल्या आहेत.

**२] चॉंदबिबीचा महाल :**

चॉंदबिबी ही अहमदनगरचा निजामशहा पहिला हुसेन याची कन्या व पुढे त्याचा वारसदार बनलेल्या बु-हाण-उल-मुल्कची बहिण होती. तिला अरबी, फार्शी, मराठी, कन्नड, तुर्की या भाषांचे सखोल ज्ञान होते. ती विद्वान स्त्री होती. तिच्या बुद्धीमत्तेला सौंदर्याचीही जोड होती. तिला सतार वाजविण्याचा व फुलांची चित्रे काढण्याचा छंद होता. विजापूरचा सुलतान पहिला अली आदिलशहा याच्याशी तिचा विवाह झाला होता. १५८० मध्ये त्याच्या मृत्यूनंतर सत्तासंघर्षामुळे आदिलशाहीत अंदाधुंदी माजली. सुमारे दशकभर चाललेल्या उलथापालथी नंतर आदिलशाहीची घडी नीट बसवल्यावर विधवा चॉंदबिबी अहमदनगरला आपल्या माहेरी आली. इथुन पुढे तिनेच निजामशाहीचे तख्त राज्यपालक राणीच्या नात्याने सांभाळले. नोव्हेंबर १५९५ मध्ये निजामशाही बुडविण्यासाठी बादशहा अकबराच्या सैन्याने अहमदनगरवर चाल केली. तेव्हा चॉंदबिबीने निजामशाहीच्या सैन्याचे नेतृत्व करुन मोगल सैन्यास अल्पकाळ रोखून धरले. कालांतराने जेव्हा मोगलांशी युद्धबंदीच्या तहाची बोलणी ती करु लागली, तेव्हा ती मोगलांना फितुर झाल्याच्या अफवा पसरु लागल्या. निजामशाही निजामशाही सैन्यातील असंतोषाने भडकलेल्या काही लोकांच्या जमावाने तिची हत्या केली. तिच्या मृत्यूनंतर चारच महिन्यांनी मोगलांनी अहमदनगरचा पाडाव केला. असे सांगितले जाते की, अहमदनगर मधून दिल्ली पाहण्याची तिची इच्छा होती. म्हणूनच अहमदनगर शहरात तिने एक महाल बांधण्यास सुरुवात केली होती. परंतु या महालाचे तीनच मजले बांधून पूर्ण झाल्यानंतर तिची हत्या झाली. त्यामुळे पुढे हे बांधकाम बंद पडले. चॉंदबिबीचा विश्वासू सेवक सलाबतजंग याची कबर येथे आहे.



Copyright © 2020Authors

ISSN:0971-2143
Vol-31-Issue-09-April-2020

३] फराहबक्ष महाल :

फराहबक्ष महाल ही वास्तू चौरसाकृती तलावाच्या मध्यभागी असून अष्टकोनी आहे. मूर्तिजा निजामशहा याने या महालाचे बांधकाम १५७६ ते १५८६ या काळात करवून घेतले. घुमट, उंच कमानी असलेल्या या महालाच्या मध्यभागी रंगमहाल आहे. मध्यभागी तसेच चारही बाजूंना कारंजी असून त्यासाठी खापरी नळाने त्यात पाणी सोडण्यात येत होते. मोगल बादशहा शहाजहानने जगप्रसिद्ध ताजमहाल बांधण्याची प्रेरणा फराहबक्ष महाल पाहुनच घेतली होती.

बाग रोजा, दमडी मशिद, कोटला विद्यापीठ या स्थापत्यकलेच्या व विशिष्टत्वाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असलेल्या वास्तू निजामशाही काळातच अहमदनगर शहरात उभारल्या गेल्या.

इ.स. १४९० मध्ये अहमदनगर शहराची स्थापना झाली. तेव्हापासून ते थेट इ.स.१६३० पर्यंत म्हणजेच मराठी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जन्मवर्षापर्यंत अहमदनगर शहरानेच दक्षिण भारताच्या राजकारणाची सूत्रे हलविली होती. मध्ययुगीन महाराष्ट्राचा इतिहास घडविणात या शहराचा खूप मोठा वाटा आहे. अहमदनगरचा इतिहास म्हटले की, निजामशाहीचा इतिहास असेच समीकरण डोळ्यांसमोरे येते.

अहमदनगरच्या निजामशाहीत शहा शरिफ, शहा ताहीर, बुवा बंगाली हे मुस्लिम संत, सलाबत खान, मलिक अंबर, मालोजी राजे भोसले, शहाजीराजे भोसले हे मातब्बर व शूर मुत्सद्दी, चाँदबिबी ही विरांगणा, अहमद निजामशहा, बु-हाण निजामशहा, हुसेन निजामशहा हे कर्तबगार राज्यकर्ते होऊन गेले. त्यांनी अहमदनगर शहराला मोठे वैभव प्राप्त करुन दिले. तत्कालिन आंतरराष्ट्रीय पातळीवरील महत्त्वाची शहरे असलेल्या बगदाद व कैरो यांच्याशी अहमदनगर शहर स्पर्धा करु लागले होते. या कर्तबगार राज्यकर्त्यांनी निर्माण करुन ठेवलेल्या निजामशाहीच्या इतिहासाच्या पाऊलखुणा अहमदनगर शहरामध्ये फिरताना ठिकठिकाणी पहावयास मिळतात.

असे असतानाही जर कोणाकडून प्रश्न येत असेल की, अहमदनगरमध्ये पाहण्यासारखे काय आहे? तर हे इतिहासप्रेमी नागरिकांचे अपयश नाही का?

Copyright © 2020Authors

ISSN:0971-2143
Vol-31-Issue-09-April-2020

**तळटिपा :**

१] अहमदनगर नगरपालिका शतसांवत्सरिक स्मारक ग्रंथ, अहमदनगर नगरपालिका प्रकाशन, अहमदनगर, १९५४, पृ.६-७

२] रा.गो. मिरिकर (संपा.), अहमदनगर शहराचा इतिहास, अहमदनगर जिल्हा ऐतिहासिक वस्तुसंग्रहालय प्रकाशन, अहमदनगर, पृ.२

३] तत्रैव, पृ.३



Copyright © 2020Authors



# PUBLICATION CERTIFICATE

**This publication certificate has been issued to**

डॉ. अर्चना टाक

**For publication of research paper titled**

पर्यटनाचे उपेक्षित वैभव – अहमदनगर शहरातील वास्तू


**Published in** *Purakala with ISSN 0971-2143 (9)*

**Vol.** *31* **Issue** *9* **Month** *April* **Year** *2020*

**Impact Factor** *5.60*


**The journal is indexed, peer reviewed and listed in UGC Care.**

**Editor**

Note:This eCertificate is valid with published papers and the paper must be available online at https://www.purakala.com/index.php/0971-2143